धडा पाठ 23

आपण आणि आपल्या भाषा

गोपाळ : माधवराव, तुम्ही ही बातमी वाचलीत का?

माधव : कोणती? ती भाषेबद्दल आलेली बातमी ?

गोपाळ : या बातम्या रोज रोज वाचताना वाटतं या भाषांच्या प्रश्नावर देशात समस्या तर निर्माण केल्या जाणार नाहीत ना?

माधव : नाही गोपाळराव, तसं होऊ दिलं जाणार नाही. अर्थात तुम्हाला वाटतं ते काही चूक नही.

गोपाळ : भारताची भाषावर प्रांचरचना न केली जाता सुटसुटीत अशा चार किंवा पाच शासकीय विभागात विभागणी केली गेली असती तर हे प्रश्न तरी उद्‌भवले नसते! त्या त्या भागांतील सर्व भाषांना गुण्यागोविंदाने नांदणे भाग पडले असते.

माधव : मला हे तुमचे मत पटत नाही. आपल्या राज्यकारभाराची भाषा मातृभाषाच हवी हे बरोबरच आहे. तेच नैसर्गिकही आहे. त्यामुळे आपल्याकडून हा कारभार चालवला जात आहे असे प्रत्येकाला वाटेल! तसेच भाषावार प्रांतरचनेने निरनिराळ्या प्रादेशिक भाषांची समृद्धीही साधली जात आहे.

गोपाळ : पण मग भाषिकवादांचे काय? भाषाभाषांतील वाढत्या तेढीचे परिणाम काय होत आहेत हे तर रोजच्या पाहण्यात येत आहेत.

हम और हमारी भाषाएँ

गोपाल : माधवराव, तुमने यह खबर पढ़ी है क्या?

माधव : कौनसी? वह भाषा के बारे में आई हुई खबर?

गोपाल : हाँ। हररोज ऐसी खबरें पढ़कर लगता है कि भाषाओं के इस प्रश्न पर देश में समस्याएँ तो नहीं खडी की जाएँगी?

माधव : नहीं गोपालराव ऐसा नहीं होने दिया जाएगा। हालांकि तुम्हारे सोचने में कोई भूल नही है।

गोपाल : भाषा के आधारपर राज्यों की रचना न करते हुए यदि प्रशासनिक दृष्टि से देश को चार या पाँच हिस्से में बाँट दिया जाता तो ये प्रश्न उठते ही नहीं। तब हर भागों की सभी भाषाओं को साथ साथ प्रेम से रहना ही पड़ता।

माधव : मैं आपसे सहमत नहीं हूँ। अपना राज-काज मातृभाषा में हो यही उचित है। यही स्वाभाविक भी है। इससे हर-एक को लगेगा कि सारा राज-काज उसके द्वारा ही चलाया जा रहा है। भाषावर राज्यों की संरचना से सभी प्रादेशिक भाषाओं का सहज विकास भी हो रहा है।

गोपाल : लेकिन भाषा विवादों का क्या होगा? भाषा भाषा के बीच बढ़ते वैमनस्य के परिणाम तो हररोज दिखाई दे रहे हैं।

माधव : होय, खरं आहे. भाषा अभिमानाला दुरभिमानाचे स्वरूप येत आहे. त्यामुळे हे प्रश्न उग्र स्वरूप धारण करत आहेत. या दुष्ट प्रवृत्तीपासून आपल्या नागरिकांना दूर ठेवण्याचे सर्व प्रयत्न राज्य सरकारांकडून केले गेले पाहिजेत. आपल्यासारख्या सुशिक्षित नागरिकांकडूनही असे प्रयत्न करण्यात आले पाहिजेत.

गोपाळ : मला वाटतं, सहिष्णुता, सहकार्य, बंधुभाव ह्या गुणांचा लोप तर होत नाही ना?

माधव : होय. अशी भीती मला वाटू लागली आहे खरी पण याच गुणांची लोकशाहीच्या पोषणासाठी आवश्यकता आहे. तेव्हा या गुणांचा सर्वत्र आग्रहाने पुरस्कार केला गेला पाहिजे. विशेषतः मुलांना त्यांच्या संस्कारक्षम वयातच या गुणांचं बाळकडू पाजलं गेलं पाहिजे. तसं झालं तरच उद्याच्या समाजाला या प्रश्नांतून मुक्त केलं जाईल.

गोपाळ : म्हणजे शेवटी तुम्ही शिक्षणावर आलात तर!

माधव : होय, सुनागरिकत्वाला सुसंस्कारांचा पाया हवाच. योग्य प्रकारचे शिक्षण हेच तर आपल्या सर्व प्रश्नांचे एकमेव उत्तर आहे.

माधव : यह तो सच है। भाषागत स्वाभिमान धीरे धीरे कट्टरता में बदलता जा रहा है। इसलिए यह समस्या उग्र रूप धारण कर रही है। अपने देशवासियों को इस दुष्प्रवृत्ति से दूर रखने के लिए राज्य सरकारों द्वारा हर तरह के प्रयत्न किए जाने चाहिए। हम जैसे सुशिक्षित नागरिकों के द्वारा भी इस तरह के प्रयत्न किए जाने चाहिए।

गोपाल : मुझे लगता है कि सहिष्णुता, सहकारिता, बंधुत्व आदि गुण लुप्त तो नही होते जा रहे हैं।

माधव : हाँ यह भय तो मुझे भी लगने लगा है। पर लोकतंत्र के पोषण के लिए ऐसे गुणों की आवश्यकता है। अतः इन गुणों को आग्रहपूर्वक बढ़ावा दिया जाना चाहिए। विशेष रूप से बच्चों को बाल्यकाल से ही आयु में ऐसे गुणों की शिक्षा दी जानी चाहिए। तभी कल के समाज को इन प्रश्नों से मुक्त किया जाएगा।

गोपाल : यानि की, आखिर आप शिक्षण पर आ ही गए।

माधव : हाँ। अच्छी नागरिकता को अच्छे संस्कारों की नींव तो चाहिए ही। अच्छी शिक्षा ही हमारी सारी समस्याओं का एकमात्र उत्तर है।

शब्दार्थ

बातमी	खबर, समाचार
अर्थात	मतलब, अर्थात
चूक	गलती, चूक
विभागणी	विभाजन
(प्रश्न) उद्‌भवणे	(प्रश्न) निर्माण होना, उठना, खड़ा होना
गुण्यागोविंदाने	राजी खुशी से, सुख पूर्वक

नांदणे	सुखसे रहना (मराठी में नांदणे का अर्थ एक विशेष रूप में होता है। लड़की जब ससुराल में राजीखुशी से रह रही होती है तब कहा जाता है "मुलगी सुखात नांदत आहे."
कारभार	कार्यभार, कामकाज
साधणे	मुमकिन होना
वाद	वाद, वाद-विवाद
तेढ	दुश्मनी
धारण करणे	धारण करना
लोप होणे	नष्ट होना, लुप्त होना
भीती	डर, भय
शेवटी	आखिर में, अंत में
पाया	नींव, बुनियाद

अभ्यास

I खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1) भाषेच्या प्रश्नाबद्दलच्या बातम्या रोज रोज वाचतांना गोपाळरावांना काय वाटतं?
2) भारताची विभागणी करण्याबद्दल गोपाळरावांचे काय मत आहे?
3) भाषेबद्दलचे प्रश्न उग्र स्वरूप का धारण करत आहेत?
4) लोकशाहीला पोषक असे कोणते गुण आहेत?
5) सुनागरिकत्वाचा पाया कोणता आहे?

II उदाहरणानुसार खालील वाक्यांचे दोन प्रकारे परिवर्तन करा.

उदाहरण: मी डबा आणला.
माझ्याकडून डबा <u>आणला गेला</u> किंवा.
माझ्याकडून डबा <u>आणण्यात आला</u>.

1) कामगारांनी जिना पाडला. 2) सरकारने रस्ता रूंद केला.
3) विद्यार्थ्याने धडा वाचला.

2. *उदाहरण:* मी बातमी वाचली.
माझ्याकडून बातमी वाचली गेली.
किंवा माझ्याकडून बातमी वाचण्यात आली.

1) वहिनीने मंगळागौर साजरी केली. 2) शाळेने खंडाळ्याला सहल काढली.
3) मजूरांनी भिंत बांधली.

3. *उदाहरण:* राम औषध प्यायला.
रामकडून औषध प्यायलं गेलं.
किंवा रामकडून औषध पिण्यात आलं.

1) कलाकारांनी नाटक बसवलं. 2) सचिवांनी परिपत्रक पाठविलं.
3) पालकांनी लग्न जुळवलं.

III उदाहरणानुसार खालील वाक्यांमध्ये परिवर्तन करा.
उदाहरण: समितीकडून कार्यक्रम केला गेला.
समितीकडून कार्यक्रम करण्यात आला.

1) लेखकाकडून कादंबरी लिहिली गेली.
2) माझ्याकडून पुस्तक वाचलं गेलं.
3) सर्वांकडून आंबे खाल्ले गेले.
4) त्यांच्याकडून चित्रपट पाहिला गेला.

IV डावीकडे दिलेल्या शब्दांच्या उजवीकडे दिलेल्या वाक्यांशांशी योग्य जोड्या लावून वाक्ये तयार करा.

चादरी	डॉक्टरकडून देण्यात आलं.
कविता	त्याच्याकडून करण्यात आली.
फाईली	मुलांकडून लावण्यात आली.
औषध	आईकडून निवडले गेले.
झाडे	माझ्याकडून धुण्यात आल्या.
गहू	शिपायाकडून आणल्या गेल्या.

V खालील वाक्यात अधोरेखित शब्दाऐवजी दिलेले शब्द वापरून नवीन वाक्ये तयार करा.
रामाकडून आंबा खाल्ला गेला.
बटाटेवडे
चिंच
गोळ्या
केळं
बोरे

VI उदाहरणानुसार खालील वाक्यांचे परिवर्तन करा.
उदाहरण: काकांनी धडा वाचला.
काकांकडून धडा वाचला गेला.

1) काकांनी अहवाल लिहिला. 2) काकांनी कविता केली.
3) काकांनी बातमी ऐकली. 4) काकांनी वृत्तपत्र घेतले.
5) काकांनी परिपत्रक वाटले.

VII उदाहरणानुसार खाली दिलेल्या वाक्यांच्या जोडीमधील दुसरे वाक्य पूर्ण करा.

1. *उदाहरण:* मी रोज अभ्यास करतो.
माझ्याकडून रोज अभ्यास केला जातो.

1) मुली वर्गात कविता वाचतात.
मुलीकंडून वर्गात कविता ....

2) शिपाई तासातासाने घंटा वाजवतो.
शिपायाकडून तासातासाने घंटा ....

3) आई पायाला रक्तचंदनाचा लेप लावेल.
आईकडून पायाला रक्तचंदनाचा लेप ....

4) दिग्दर्शक दुष्काळावर माहितीपट तयार करतील.
दिग्दर्शकाकडून दुष्काळावर माहितीपट तयार ....

2. उदाहरण : मी ते काम केले.
माझ्याकडून ते काम करण्यात आले.

1) सर्वांनी झाडे लावली.
सर्वांकडून झाडे ....

2) विद्यार्थ्यांनी डबे खाल्ले.
विद्यार्थ्यांकडून डबे ....

3) आम्ही ते नाटक पाहिले.
आमच्याकडून ते नाटक ....

4) तिने सर्व कविता वाचल्या.
तिच्याकडून सर्व कविता ....

IIIV खालील संवाद पूर्ण करा.

गुरुजी, सव्वीस जानेवारीच्या कार्यक्रमाची आखणी तुमच्यावर सोपवण्यात आली होती सांगा पाहू, काय काय तयारी करण्यात आली आहे?

..... .

झेंडावंदन कुणाच्या हस्ते केले जाणार आहे?

..... .

बक्षिसे बाबूरावांकडूनच दिली जाणार आहेत ना?

..... .

नाही, नाही पहिला कार्यक्रम पहिलीच्या वर्गातर्फेच सादर करण्यात येऊ दे.

..... .

स्वागतगीत दुसरीच्या मुलींकडूनच बसवलं गेलं आहे ना?

..... .

पण आभार देशपांडे बाईंकडूनच मानले जातील ना?

..... .

IX उदाहरणानुसार कंसातील शब्दांची योग्य रूपे करून व योग्य क्रमाने ते शब्द ठेवून वाक्ये बनवा.

उदाहरण: (मी) (सिनेमा) (पाह) (तो) (ये)
तो सिनेमा माझ्याकडून पाहण्यात आला.

1) (ते) (चित्र) (काढणे) (जा) (एक) (रंगीत)
2) (ये) (पाहणे) (आम्ही) (एक) (चित्रपट) (जुना) (काल) (देवआनंदचा)
3) (तो) (खूप) (चित्रपट) (ही) (दिग्दर्शन) (करणे) (ये) (रहस्यमय)
4) (शाळा) (आखणे) (जा) (कार्यक्रम) (एक)

X उदाहरणानुसार खालील वाक्यांचे परिवर्तन करा.

उदाहरण: रामकडून श्लोक म्हटला गेला.
रामने श्लोक म्हटला.

1) मुख्याध्यापकांकडून उद्घाटन करण्यात आले.
2) मुलांकडून कार्यक्रम आखले गेले.
3) लोकांकडून मिरवणूक काढली गेली.
4) ज्योतीबांकडून स्त्रीशिक्षणाचा पाया घालण्यात आला.
5) मुलीकडून कामं करण्यात आली.

पढ़िए और समझिए

भाषा आणि राष्ट्रीय एकात्मता

स्वराज्य मिळालं, स्वातंत्र्य मिळालं पण राज्यकारभार परकीय भाषेतच चालवण्यात येत होता. भारतीय भाषांतून राज्यकारभाराच्या मागण्या करण्यात येत होत्या. भाषावर प्रांतरचनेचे वचन देण्यात आले होते. त्या वचनपूर्तीची वाट पाहण्यात येत होती. अखेर पोट्टू श्रीरामलू यांच्या उपोषणाने हा प्रश्न धसास लागला. भारताच्या लोकशाही शासनाकडून भाषावर प्रांतरचना करण्यात आली. पण त्यामुळे प्रश्नांचा निकाल लावला गेला नाही. सरकारला नवनवीन प्रश्नांचा सामना करावा लागला. मराठी भाषिक महाराष्ट्र, कन्नड भाषिक कर्नाटक, तेलुगू भाषिक आंध्र असे प्रांत निर्माण करण्यात आले. सर्व एक भाषिक लोक एकाच प्रांतात येणे शक्यच नव्हते. प्रत्येक प्रांतात निकटवर्ती प्रांतातील भाषिक थोड्या संख्येने राहणे अपरिहार्य होते. या भाषिक अल्पसंख्यांकांचे नवीन प्रश्न निर्माण झाले. सरकारवर अनेक प्रकारचे दबाव आणले जाऊ लागले. आंदोलने करण्यात आली. भाषेमुळे कटुता निर्माण झाली. पण हे काही स्वार्थी लोकांचे काम होते. खरे तर भारतीय लोक कधीही संकुचित मनोवृत्तीचे नव्हते आणि नाहीत. आपण नेहमीच दुसरी भाषा, साहित्य, संस्कृती, वेशभूषेचा आदर करीत असतो. भाषावर प्रांतरचनेमुळे त्यात काहीही फरक पडला नाही. आजही अनेक लोक दुसऱ्या प्रांताची भाषा शिकतात. त्या भाषेतील साहित्यकृतींचे भाषांतर आपल्या भाषेत करतात. राज्य आणि केंद्र सरकारकडूनही अशा प्रकारच्या भाषिक देवाणघेवाणीला प्रोत्साहन देण्यात येते. अनेक तरूण याच दिशेने काम करण्यास उत्सुक आहेत हे

आशादायक आहे. काही लोक भाषेच्या नावावर वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. परंतु ते यशस्वी होत नाहीत. लोकांना हे माहित आहे की, भाषा परस्परांना जोडणारी असते तोडणारी नव्हे.

शब्दार्थ

मागण्या	माँगें
करण्यात	करने में
देण्यात आले होते	दिया गया था
उपोषण	अन्नजल का त्याग
धसास लागणे	पूरा करना
शासनाकडून	शासन द्वारा
निकाल	फल, परिणाम, नतीजा
सामना करणे	सामना करना
शक्यच नसणे	बस में नहीं होना
निकटवर्ती	पासवाले
थोडा	कम
कटुता	कड़वाहट
स्वार्थी	स्वार्थी, खुदगर्ज
संकुचित मनोवृत्ती	संकुचित मनोवृत्ति, तंगनज़री
आदर करणे	सम्मान करना, आदर करना
फरक	फर्क, अंतर, भिन्नता
दुसऱ्या	दूसरे
साहित्यकृती	साहित्यकृति
भाषांतर	अनुवाद
देवाणघेवाण	आदानप्रदान, बढ़ावा देना
प्रोत्साहन	प्रोत्साहन
तरुण	तरुण, युवक, युवा
याच दिशेने	इस दिशा मे
उत्सुक	उत्सुक, इच्छुक
आशादायक	आशाजनक
यशस्वी	यशस्वी
परस्परांना	आपस में, एक दूसरे को
जोडणारी	जोड़नेवाली
तोडणारी	तोड़ने वाली

अभ्यास

I खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1) स्वराज्य मिळाल्यानंतर लोकांच्या काय मागण्या होत्या?
2) भारतीय लोक कसे आहेत?
3) आजही अनेक लोक काय करतात?
4) केंद्र व राज्यसरकारकडून भाषेच्या बाबतीत काय करण्यात येते?
5) भाषा कशी असते?

II खालील वाक्ये अभ्यासा व कसांतील शब्दांची योग्य रूपे रेखांकित शब्दाऐवजी वापरून वाक्य पूरे करा.

(सगळे, खास, प्रयत्न, वैरी, अखेर, जरा, भीती)

1) मूठभर मावळ्यांच्या साहाय्यने शिवाजीने <u>शत्रूला</u> जेरीस आणले.
2) सरकारने शांततेसाठी खास <u>प्रयास</u> केले पाहिजेत.
3) आज रात्री <u>विशेष</u> पाहुणे येणार आहेत.
4) सर्वत्र <u>भयाचं</u> वातावरण आहे.
5) <u>शेवटी</u> भाषावर प्रांतरचना करण्यात आली.
6) बाळाला <u>थोडा</u> ताप आला आहे.
7) <u>सर्व</u> लोक भयभीत झाले होते.

III योग्य त्या वाक्प्रचारांचे योग्य रूप वापरून खालील वाक्ये पूर्ण करा.

(दबाव आणणे, बाळकडू पाजणे, प्रश्न धसास लागणे, प्रश्नाचा निकाल लागणे, गुण्यागोविंदाने नांदणे, सामना करणे)

1) भारतात सर्व धर्माचे लोक ..... तोच सुदिन!
2) आलेल्या प्रसंगाचा ..... हेच धीराचं लक्षण!
3) देशप्रेमाचे ..... तरच नवी पिढी देशभक्त होईल.
4) अखेर जनतेने सरकारवर ..... .
5) त्या कामगार नेत्याच्या बलिदानाने कामगारांचा ..... .
6) सात वर्षे वाट पाहिल्यावर अखेर त्या ..... .

IV हिंदीत भाषांतर करा आणि समर्पक शीर्षक द्या.

प्रत्येक राज्याचा राज्यकारभार त्या-त्या राज्याच्या भाषेतूनच चालविला गेला पाहिजे. राज्यसरकारची सर्व परिपत्रके, ध्येयधोरणे आणि नियम राज्यभाषेतूनच प्रसिद्ध केले गेले पाहिजेत. कारण राज्यातील बहुसंख्य लोकांकडून ती भाषा बोलली जाते. अनेकांकडून ती वापरली जाते. त्यामुळे सरकारचे नियम इ.सर्व लोकांना समजतील. प्रत्येकाला वाटेल की, आपल्याकडूनच राज्यकारभार चालविला जात आहे. आपल्यालाही राज्यकारभारात सामील करून घेतले गेले आहे असे सर्वांना वाटेल.

त्यामुळे लोकशाही खऱ्या अर्थाने अस्तित्वात येईल. लोकांना राज्यकारभाराबद्दल आत्मीयता वाटेल.

छत्रपती शिवाजी महाराजांनीही आपला राज्यकारभार मराठीतून करण्यासाठी 'राज्यव्यवहारकोश' तयार करवून घेतला होता. लोकमान्य टिळकांकडूनही स्वराज्य, स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषा या चार सूत्रांचा पुरस्कार करण्यात आला होता. तसेच स्वातंत्र्यवीर वि.दा. सारकरांकडूनही मराठी भाषाशुद्धीचे खूप प्रयत्न करण्यात आले. आता प्रत्येक राज्याची एक राज्यभाषा आहे. सर्व राज्यकारभार राज्यभाषेतून होतो आहे. महाराष्ट्राची राज्यभाषा मराठी आहे.

राज्यकारभाराबरोबरच शिक्षणही मातृभाषेतूनच दिले गेले पाहिजे. कारण प्रत्येकजण आपले विचार, मते, भावना इ.मातृभाषेतून उत्तम प्रकारे व्यक्त करू शकतो. भावना व विचारांचा हा आविष्कार उत्स्फूर्तपणे मातृभाषेतूनच होत असतो. म्हणूनच मातृभाषा ही मनाची भाषा असते. जर विद्यार्थ्याला मातृभाषेतून शिक्षण दिले तर तो ते उत्तम प्रकारे ग्रहण करू शकतो. परंतु मातृभाषेऐवजी परभाषेतून शिक्षण दिले तर त्याची अवस्था 'हेही नाही आणि तेही नाही' अशी होते. म्हणजे तो धड मातृभाषाही शिकू शकत नाही आणि परभाषाही नीट समजू शकत नाही. मातृभाषेचे संरक्षण व संवर्धन करायचे असेल तर प्रत्येकाकडून मातृभाषाच बोलली गेली पाहिजे. प्रत्येकजण निदान दहावीपर्यंत तरी मातृभाषेतूनच शिकला पाहिजे. प्रत्येकाला मातृभाषेतील पुस्तके उपलब्ध करून दिली गेली पाहिजेत. प्रत्येकाने ती वाचली पाहिजेत. मातृभाषा समृद्ध होण्यासाठी त्यात उत्तमोत्तम ग्रंथरचना केली गेली पाहिजे. विविध भाषांमधील उत्तमोत्तम ग्रंथसंपदा मातृभाषेत म्हणजे मराठीत (माझी मातृभाषा मराठी आहे.) आणली गेली पाहिजे. महाराष्ट्रातील पालकांकडून आपल्या मुलांना मराठीतूनच शिकण्याचा आग्रह झाला पाहिजे. मातृभाषा केवळ साहित्याची भाषा न राहता ज्ञानभाषा झाली पाहिजे. विविध भाषांमधील ज्ञान तज्ज्ञांकडून मराठीत आणण्यात आले पाहिजे. मी मराठीचा, माझ्या मातृभाषेचा पुरस्कार करतो आहे याचा अर्थ मला इतर भाषांबद्दल द्वेष आहे असे नाही. कारण सर्व भाषा परस्परांच्या भगिनी आहेत. त्या सर्वत्र गुण्यागोविंदानेच नांदायला हव्यात. एक मात्र खरे की, माता, मातृभूमी, आणि मातृभाषा महत्त्वाच्या आहेत, वंदनीय आहेत.

V मराठीत भाषांतर करा.

भारत एक विविधरंगी देश है। यहाँ अनेक धर्मों के लोग रहते हैं। सबके रहन-सहन वेशभूषा एवं खानापान भिन्न-भिन्न हैं। सभी लोगों द्वारा अपना स्वतंत्र जीवन निर्वाह किया जाता है।

जिस प्रकार हमारा देश धर्मों और रहन-सहन में विविध रूपी है उसी प्रकार भाषा के रूप में भी विविध रूपी है। इसीलिए भारत को बहुभाषी देश कहा गया है। भारत के हर राज्य की अपनी भाषा है। हरराज्य के निवासियों द्वारा अपनी भाषा बोली जाती है।

हिंदी हमारी राजभाषा है। तथापि संविधान में अन्य भाषाओं को भी सम्मानजनक दर्जा दिया गया है। संविधान के अनुसार केंद्रीय सरकार का काम काज हिंदी में किया जाना चाहिए। जहाँ-जहाँ भी केंद्रीय सरकार द्वारा पत्र व्यवहार किया जाता है वहाँ-वहाँ हिंदी का ही प्रयोग होता है।

राज्यों का कामकाज संबंधित राज्य की राजभाषा में चलाया जाता है। इसलिए हरएक राज्य की स्वीकृत भाषा को भी विकास के लिए पूर्ण अवसर दिया जा रहा है।

राज्यों में वहाँ की ही राजभाषा का प्रयोग होने से वहाँ के नागरिकों को सुविधा हो रही है। राज्य की भाषा के साहित्य का भी विकास हो रहा है। हर राज्य के साहित्यकारों द्वारा अपने-अपने राज्य की भाषा का विकास किया जा रहा है। उस प्रकार जहाँ राज्यों की अलग-अलग भाषाओं का विकास हो रहा है उसी प्रकार अन्य भाषाओं के साथ-साथ हिंदी का भी समान रूप से विकास हो रहा है।

भाषा के इस सामंजस्य द्वारा भारत एक सूत्र में बंधा हुआ है।

VI 'माझी मातृभाषा' या विषयावर मराठींत एक निबंध लिहा.

टिप्पणियाँ

I इस पाठ में मराठी के 'कर्मवाच्य' का प्रयोग सिखाया गया है। नीचे दिए गए वाक्यों के रेखांकित क्रिया रूपों पर ध्यान दीजिए।

उदाहरण:

1) आपल्याकडून हा कारभार चालवला जात आहे असे प्रत्येकाला वाटेल.
   हर एक को लगेगा कि सारा राज-काज उसके द्वारा चलाया जा रहा है।
2) या गुणांचा सर्वत्र आग्रहाने पुरस्कार केला गेला पाहिजे.
   इन गुणों को आग्रह पूर्वक बढ़ावा दिया जाना चाहिए।
3) भाषावर प्रांतरचना केली गेली.
   भाषावार प्रांतरचना की गई। (भूतकाळ)
4) भाषावार प्रांतरचना केली जाते.
   भाषावार प्रांतरचना की जाती है। (वर्तमानकाळ)
5) भाषावार प्रांतरचना केली जाईल.
   भाषावार प्रांतरचना की जाएगी। (भविष्यकाळ)

उपर्युक्त वाक्यों के रेखांकित क्रियारूपों में मराठी के 'कर्मवाच्य' का प्रयोग किया गया है। मराठी में ऐसे प्रयोगों के लिए हिंदी के समान ही मूल क्रिया के 'भूतकालिक' रूप के बाद 'जा' क्रिया के उपयुक्त रूपों का प्रयोग करते हैं।

2. नीचे दिए गए वाक्यों के रेखांकित क्रिया रूपों पर ध्यान दीजिए।

उदाहरण:

1) भाषा भाषांमधील वाढत्या तेढीचे परिणाम काय होत आहेत
हे तर रोजच्या पाहण्यात येत आहेत.
भाषा भाषा के बीच बढ़ते वैमनस्य के परिणाम तो हररोज दिखाई दे रहे हैं।

2) आपल्यासारख्या सुशिक्षित नागरिकांकडूनही असे
प्रयत्न करण्यात आले पाहिजेत.
हम जैसे सुशिक्षित नागरिकों को के द्वारा भी इस तरह के प्रयत्न
किए जाने चाहिए।

3) भाषावार प्रांतरचना करण्यात आली.
भाषावार प्रांतरचना की गई है। (भूतकाळ)

4) भाषावार प्रांतरचना करण्यात येते.
भाषावार प्रांतरचना की जाती है। (वर्तमानकाळ)

5) भाषावार प्रांतरचना करण्यात येईल.
भाषावार प्रांतरचना की जाएगी। (भविष्यकाळ)

उपर्युक्त वाक्यों के रेखांकित क्रिया रूपों में भी मराठी के 'कर्मवाच्य' का प्रयोग किया गया है। मराठी में ऐसे वैकल्पिक प्रयोगों के लिए मूल क्रिया में '-ण्यात' जोड़कर 'ये' (आना) क्रिया के उपयुक्त रूपों का प्रयोग करते हैं।

ध्यान दे कि, मराठी में 'कर्मवाच्य' प्रयोग दो प्रकार से किया जाता है। दोनों प्रकार का कर्मवाच्य समान रूपसे सर्वत्र प्रयुक्त हो सकता है।

मराठी में कर्मवाच्य प्रयोग बनाने के लिए मूल वाक्य के कर्ता को करण कारक का परसर्ग '-कडून' जोड़कर मूल क्रिया के भूतकालिक रूप के साथ 'जा' क्रिया के उपयुक्त रूप का प्रयोग होता है। ऐसे वाक्यों में कर्ता कई बार अभिप्रेत या अस्पष्ट होता है। जब कर्म को प्राधान्य देकर विधान करना होता है या कर्ता स्पष्ट नहीं होता है, या कर्ता का उल्लेख टालना होता है तब ऐसा प्रयोग किया जाता है।